**महत्वाचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८.
**सामान्य प्रशासन विभाग.**
क्र. साप्रवि/तप/१७अ/कावि/६६६/२०२४.
दिनांक :- १८/१०/२०२४.

---

**विषय :- सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४ च्या निवडणुक कामकाजा करीता नियुक्त महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचा-यांना बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीमधुन सुट/सवलत देणे बाबत...**

आदेश,

**महाराष्ट्र राज्य सार्वत्रिक विधानसभा निवडणुक २०२४** च्या निवडणुकचे कामकाज करणेकामी महानगरपालिकेच्या विविध विभागातील अधिकारी / कर्मचा-यांच्या नियुक्त्या विधानसभा मतदारसंघा अंतर्गत विविध कार्यालया करीता करणेत आलेल्या आहेत. सदरचे निवडणुक कामकाज हे अत्यंत महत्वाचे असुन सदरचे कामकाज कालमर्यादेत करणे आवश्यक व अभिप्रेत आहे. त्यानुसार निवडणुक कामकाजासाठी नियुक्त केलेल्या अधिकारी / कर्मचा-यांना बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीमधुन सुट देणेची बाब सामान्य प्रशासन विभागाच्या विचाराधीन आहे.

सबब, **मी , आयुक्त**, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-१८, **महानगरपालीका अधिकारी / कर्मचा-यांची सेवा लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० मधील कलम २९ या अधिनियमानुसार निवडणुक कामकाजाकामी अधिग्रहित करणेत येत असल्याने व निवडणुकीचे कामकाज हे राष्ट्रीय कामकाज असल्याने संबंधित अधिकारी / कर्मचा-यांना मनपाच्या बायोमेट्रीक उपस्थिती प्रणाली मधुन त्यांची सेवा निवडणुकीच्या कामकाजाकामी निवडणुक कार्यालयाकडे रुजू झालेच्या दिनांकापासून सवलत देणेस प्रस्तुत आदेशान्वये मान्यता देत आहे.**

**तसेच निवडणुक कामकाज संपल्यानंतर संबंधित अधिकारी / कर्मचा-यांना निवडणुक कामकाजातुन कार्यमुक्त केलेनंतर त्यांनी त्यांच्या मुळ विभागात विनाविलंब त्वरीत रुजू होउन बायोमेट्रीक उपस्थिती प्रणालीमध्ये उपस्थिती नोंदविणे व हजेरी पत्रकावर दैनंदिन स्वाक्षरी करणे बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.**

(शेखर सिंह)
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.

**प्रति :-**

**१. सर्व विभाग प्रमुख / शाखा प्रमुख.**

२/- प्रस्तुत आदेशाची, निवडणुक विभागाकडील नियुक्ती आदेशाची व निवडणुक विभागाकडील कार्यमुक्त आदेशाची नोंद हजेरीपत्रकात संबंधित अधिकारी / कर्मचा-यांच्या नावापुढे घेण्यात यावी.

**प्रत :-**

१) मा. जिल्हाधिकारी कार्यलय पुणे, निवडणुक शाखा.
२) २०५ चिंचवड विधानसभा मतदार संघ, निवडणुक कार्यालय.
३) २०६, पिंपरी विधानसभा मतदार संघ, निवडणुक कार्यालय.
४) २०७, भोसरी विधानसभा मतदार संघ, निवडणुक कार्यालय.

२/- निवडणुक कार्यालयाकडे काम करीत असलेल्या मनपा अधिकारी / कर्मचारी यांचे मासिक हजेरी अहवाल संबंधित अधिकारी / कर्मचा-यांच्या मनपा अस्थापना विभागाकडे पाठविण्यात यावेत.